लोकमत पु. पान क्र. 1

## तोतया पोलिसांनी केली फसवणूक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** बोळींजच्या नानभाट रोडवरील श्री साई कॉम्प्लेक्स येथे राहणाऱ्या संजीवनी वायंगणकर (वय ६०) यांची पोलिस असल्याची बतावणी करून फसवणूक झाल्याची घटना घडली आहे.

बुधवारी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास गोकुळ टाउनशिप येथील बेसिन कॅथलिक बँकेतून घरी पायी चालत जात असताना बोळींज नाका येथील मस्जीदजवळ अनोळखी दोन इसमांनी ते पोलिस असल्याची बतावणी केली. त्यांना ५० हजार रुपये किमतीची १२ ग्रॅम वजनाची सोन्याची चेन व लॉकेट कागदात पुडी बांधून पर्समध्ये ठेवण्याचा बनाव करून हातचलाखीने लबाडीने घेऊन जात वायंगणकर यांची फसवणूक केली. बोळींज पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# उमेदवारांनी घेतलेल्या हरकती फेटाळल्या

## मीरा-भाईंदरमध्ये २३ उमेदवारांचे अर्ज वैध

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर विधानसभा मतदारसंघासाठी दाखल उमेदवारी अर्जांच्या छाननी प्रक्रियेदरम्यान भाजपचे माजी आ. नरेंद्र मेहता व काँग्रेसचे मुझफ्फर हुसेन, अपक्ष आ. गीता जैन यांच्या उमेदवारी अर्जांवर विविध मुद्दे उपस्थित करत आक्षेप घेण्यात आले, परंतु निवडणूक निर्णय अधिकारी सुनील भुताळे यांनी हरकती, आक्षेप फेटाळून लावत सर्वच २३ उमेदवारांचे अर्ज पडताळणीमध्ये वैध ठरवले आहेत.

उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत २९ ऑक्टोबरला संपली. सर्व नामनिर्देशन अर्जांची छाननी निवडणूक निर्णय अधिकारी सुनील भुताळे यांनी बुधवार ३० ऑक्टोबर रोजी उमेदवार व त्यांचे प्रतिनिधींसमोर केली.

### भाजपमध्ये जास्त बंड

१ भुताळे यांनी आक्षेप फेटाळून लावत सर्व २३ उमेदवारांचे उमेदवारी अर्ज वैध ठरवले आहेत. त्यामुळे आता ४ नोव्हेंबरपर्यंत यातील किती उमेदवार माघार घेतात याकडे लक्ष लागले आहे.

२ भाजपमध्ये सर्वांत जास्त बंडखोरी झाली आहे. भाजपचे माजी सभापती सुरेश खंडेलवालसह माजी नगरसेवक चंद्रकांत मोदी व हंसुकुमार पांडे, आदी भाजपशी संबंधित इच्छुकांनी उमेदवारी अपक्ष म्हणून दाखल केली आहे.

३ भाजपचे मेहता समर्थक एजाज खतिब यांनीही अपक्ष म्हणून अर्ज भरला आहे. याशिवाय माजी उपनगराध्यक्ष अरुण कदम, मनसेचे संदीप राणे आदी रिंगणात आहेत.

लोकमत पु. पान क्र. 2

# फटाक्यांच्या १८ बेकायदेशीर दुकानांवर वसईत कारवाई

## गुन्हा दाखल : सुरक्षितता नियमांचे ठिकठिकाणी उल्लंघन

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** दीपावली म्हणजे प्रकाशोत्सव, फटाक्यांची आतषबाजी, दिवाळीत ठिकठिकाणी फटाक्यांचे स्टॉल लागलेले दिसतात. मात्र, फटाके विक्री करण्यासाठी काही नियम घालून देण्यात आलेले आहेत. मात्र, वसई-विरारमधील बहुतांश फटाके विक्रेते नियमांकडे सोयीस्करीत्या दुर्लक्ष करताना दिसतात. शहरात अनेक ठिकाणी बेकायदेशीर फटाके विक्रीची दुकाने थाटलेली असून अशा सुमारे १८ दुकानांवर पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत. फटाक्यांची दुकाने शहरात अनेक ठिकाणी असून स्टॉलला परवानगीपासून ते त्याची मांडणी आणि त्याच्या सुरक्षितता याबाबतचे नियम विक्रेते पाळतातच असे नाही.



▪ विक्रेत्यांनी सुरक्षा नियमांकडे महापालिका आणि अग्निशामक दलानेही कटाक्षाने लक्ष देऊन बेकायदेशीर दुकानांवर कारवाई करण्याची पर्यावरणप्रेमी मागणी नागरिकांकडून होत आहे. वसईतील नायगाव येथे ४, तुळिंजला ९, माणिकपूरला २ आणि आचोळ्याला १ अशा १६ फटाके विक्रेत्यांवर मंगळवारी आणि बुधवारी पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत.

### 'गर्दीच्या ठिकाणी फटाक्यांवर बंदी हवी'

वसई-विरारमध्ये अवैध फटाक्यांची दुकाने मोठ्या प्रमाणात मांडली आहेत. विशेषत: गर्दीच्या ठिकाणी फटाक्यांच्या विक्रीवर बंदी घालावी. दिवाळी खरेदीसाठी बाजारपेठेत गर्दी होत आहे. अशा ठिकाणी ही दुकाने नसावीत.

- मनीषा वाडकर, स्थानिक महिला

विनापरवानगी फटाके विक्री करणाऱ्यांची माहिती मनपाला कळवावी. जेणेकरून अशा विनापरवानगी फटाके विक्री करणाऱ्यांवर कारवाई करता येणे शक्य होईल, असे मनपा प्रशासनाने म्हटले आहे.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

लोकमत पु. पान क्र. ३

## अल्पवयीन मुलाची आत्महत्या

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** वसईच्या राजावलीतील आशांकुर आश्रम येथे दीपेश थापड (१४) या मुलाने आत्महत्या केली आहे. त्याने बुधवारी आश्रमातील चर्चच्या बाजूच्या रूममध्ये छताला असलेल्या पंख्याच्या हुकाला कपड्याने गळफास घेतला. वालीव पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

# 'मोफत गिफ्टच्या भानगडीत पडू नका'

## सत्यता तपासा : सायबर पोलिसांचे आवाहन

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** दिवाळी खरेदीसाठी वेगवेगळ्या वेबसाइटवर मोफत गिफ्टच्या ऑफर येत आहेत. सायबर चोरटे संधीचा फायदा उचलतात. फ्री दिवाळी गिफ्टच्या नावाने ही फसवणूक होऊ शकते. त्यामुळे मोफत गिफ्टच्या भानगडीत पडू नका, असे आयुक्तालयातील नागरिकांना सायबर विभागाने आवाहन केले आहे.

विविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर फेक मेसेज फिरत असून सणासुदीच्या ऑफरचा दावा करून वापरकर्त्यांना गिफ्ट लिंक्स आणि बक्षिसे देऊन भुरळ घालतात. फसवणूक करणारे बहुतेक महिलांना लक्ष्य करत आहेत. व्हॉट्सॲप, टेलिग्राम, इन्स्टाग्राम खात्यांवरील समवयस्कांमध्ये लिंक शेअर करण्यास सांगत आहेत.

ॲप डाऊनलोड करण्यापूर्वी त्याच्या सत्यतेची पडताळणी करावी, कोणताही अनोळखी कॉल आल्यास क्रेडिट कार्ड / बँकेशी संबंधित माहिती देऊ नये, अथवा ओटीपी शेअर करू नये, क्रेडिट कार्डद्वारे व्यवहार करताना त्याची माहिती कोठेही सेव्ह करू नये, असे आवाहन सायबर अधिकाऱ्यांनी केले आहे.



फटाक्यांच्या विक्री स्टॉलकरिता काटेकोर नियम व निकष घालून देणे गरजेचे असताना मीरा-भाईंदरमध्ये सर्रास स्टॉल लावलेले दिसत आहेत.

# प्रदूषणकारी फटाके स्टॉलना दिले नियमबाह्य परवाने?

## मीरा-भाईंदर महापालिकेविरोधात नाराजी

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** शहरात हवेतले प्रदूषण एकीकडे वाढले असताना मीरा-भाईंदर महानगरपालिकेने घातक असे प्रदूषणकारी फटाके स्टॉलना सार्वजनिक वर्दळीच्या ठिकाणी नियमबाह्यपणे परवानग्या दिल्या आहेत, तर पोलिसांनीही याकडे कानाडोळा केला असल्याचा आरोप केला जात आहे.

शासनाच्या गृह विभागाच्या आदेशानुसार सार्वजनिक ठिकाणी, गर्दीच्या ठिकाणी तसेच निवासी इमारतीमध्ये फटाके विक्रीस परवाने देता येत नाहीत. भारतीय विस्फोटक कायदा १८८४ नुसार नागरिकांच्या जीवित आणि मालमत्तेच्या सुरक्षेची काळजी घेणे महापालिका व पोलिसांना बंधनकारक आहे. मुंबई उच्च न्यायालयानेसुद्धा फटाके विक्रीचे परवाने मोकळ्या पटांगणात देण्याचे आदेश दिलेले आहेत.

फटाके विक्रीसाठी मोकळ्या मैदानांमध्ये स्टॉलना परवानगी देणे, नागरी वस्ती वा रहदारीचे रस्त्यांवर फटाके स्टॉलना परवानगी देता येत नाही. कारण, फटाके हे अतिशय ज्वलनशील असल्याने फटाके दुकानांना आगी लागून जीवघेण्या दुर्घटना झाल्या आहेत.

### पोलिसांचीही स्टॉलना ना-हरकत

- विशेष म्हणजे, पोलिसांनीही महापालिकेच्या पावलावर पाऊल टाकत स्टॉलना ना-हरकत दिली आहे.
- रस्ते व नाक्यांवर लोकांच्या जीवाशी खेळत फटाका स्टॉल सर्रास लावण्यात आले आहेत. हरित फटाके व प्रदूषण न करणाऱ्या फटाक्यांना प्रोत्साहन देण्याऐवजी महापालिकेने सर्रास घातक असे प्रदूषणकारी फटाके स्टॉलना नागरिकांच्या जीवाशी खेळत कायदे-नियम धाब्यावर बसवून परवाने दिल्याने कारवाईची मागणी होत आहे.
- हा फटाके स्टॉल परवाना घोटाळा असून, या प्रकरणात महापालिका आयुक्तांसह संबंधित अधिकारी यांना निलंबित करावे, त्यांच्यावर भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यासह अन्य कलमांनुसार गुन्हा दाखल करावा. नियमबाह्य प्रदूषणकारी फटाके स्टॉल तोडून साहित्य जप्त करावे, अशी मागणी सत्यकाम फाउंडेशनचे कृष्णा गुप्ता, गो ग्रीन फाउंडेशनचे हरबा कोनापुरे, फॉर फ्युचर इंडियाचे हर्षद ढगे आदींसह अनेक जागरूक नागरिकांनी केली आहे.

लोकमत पान क्र. २

# फटाके फोडण्यावरून दोन गटांत राडा



लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** वर्दळीच्या रस्त्यावर फटाके फोडण्यावरून राडा करणाऱ्या दोन गटांतील पाच जणांना भाईंदर पोलिसांनी अटक केली आहे. वरिष्ठ पोलिस निरीक्षक धीरज कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस अधिक तपास करीत आहेत.

भाईंदर पूर्वेकडील नवघर मार्गावर वर्दळीच्या ठिकाणी दीपक दास, सामंता बाघ यांच्यासह तिघे जण फटाके फोडत होते. त्यावेळी रस्त्यावरून दुचाकीने जाणाऱ्या एकाने रस्त्यावर बॉम्ब का फोडता, असा जाब विचारत, त्यांना शिवीगाळ केली. त्यावरून दोन्ही बाजूंच्या गटामध्ये राडा झाला. यावेळी एकमेकांना जबर मारहाण करण्यात आली तसेच बर्फ तोडण्याच्या तीक्ष्ण हत्याराने वारही करण्यात आले.

पोलिसांनी याप्रकरणी एकूण नऊ जणांविरोधात गुन्हा दाखल करत पाच जणांना अटक केली. अटक केलेल्यांमध्ये सामंता, दीपक, रॉबिन, आबिद व साबिद यांचा समावेश आहे.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

पुढारी पान क्र. ३

# गुंतवणूक करण्यास सांगून फसवणूक केलेले २९ लाख रुपये मिळाले परत

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

इनवेस्ट ॲप मध्ये गुंतवणुक करण्यास सांगुन फसवणुक केलेले २९ लाख रूपये सायबर पोलीस ठाणे यांनी तपास करून तक्रारदार याला परत मिळवून दिले आहेत.

मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील कार्यक्षेत्रातील माणिकपुर पोलीस ठाणे हद्दीत राहणारे तक्रारदार रोमिओ घोन्साल्वीस यांनी ऑनलाईन शेअर ट्रेडिंग करून अधिक रक्कम मिळत असल्याने बनावट फेक इनवेस्ट ॲप मध्ये गुंतवणुक केली. परंतु तक्रारदार यांना कोणताही परतावा मिळाला नाही. त्यावर तक्रारदार यांनी आर्थिक फसवणूक झाल्याने सायबर पोलीस ठाण्यात तक्रारी अर्ज सादर केला. तात्काळ तक्रारी अर्जाची नोंद घेतली तसेच ऑनलाईन एनसीसीआरपी पोर्टलवर तक्रार नोंदविण्यात आली.

तक्रारदार यांचा तक्रारी अर्ज प्राप्त होताच झालेल्या व्यवहाराची सविस्तर माहिती घेवून तक्रारदार यांची ऑनलाईन एनसीसीआरपी पोर्टलवर तक्रार नोंदवल्याने फसवणुकीची वर्ग झालेली रक्कम संशयीत बँक खात्यात थांबविण्यात आली. तक्रारदार यांचे फसवणुकीचे अनुषंगाने माणिकपुर पोलीस ठाण्यात विविध कलमा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असुन प्राप्त तक्रारी अर्ज तसेच गुन्हयांचे तपासाचे अनुषंगाने सायबर पोलीस ठाणे यांचेकडून तपास करण्यात आला.

तक्रारदार याची बँक खात्यांमध्ये थांबविण्यात आलेली रक्कम परत मिळवण्यासाठी न्यायालयमध्ये अर्ज सादर करण्याबाबत तक्रारदार यांना सुचना देण्यात आल्या. तक्रारदार यांनी त्यांची फसवणूकीची रक्कम परत मिळवण्यासाठी न्यायालयात याचिका सादर केले. त्याबाबत सायबर पोलीस ठाणे यांनी न्यायालयामध्ये सविस्तर अहवाल सादर केला. गेल्या ११ महिन्यापासुन सायबर पोलीस ठाणे यांनी न्यायालय तसेच बँकेकडे तक्रारदार यांची रक्कम मिळवण्यासाठी पाठपुरावा करुन न्यायालयाचे आदेश प्राप्त केले. तक्रारदार यांची फसवणुक झालेली २९ लाख रूपये त्यांचे मुळ खात्यात परत मिळवून देण्यात आले आहे.

# कत्तलीसाठी गाईंची वाहतूक करणाऱ्या टेम्पोवर कारवाई

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीत दहिसर चेकनाका येथे कत्तलीसाठी गाई घेवून जाणाऱ्या टेम्पोवर काशीमीरा पोलिसांनी कारवाई करून ३ गाई व ३ वासरांची सुटका केली आहे. अहमदाबाद-मुंबई येथील हायवेवरील बाफना, नायगाव येथे टेम्पो चालकाने टेम्पो भरधाव चालवुन तक्रारदार राजेश पाल व सोहन नेगी यांच्या अंगावर गाडी घालुन त्यांना जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. तसेच या टेम्पो चालकाने तेथून गाडी घेवून पळून गेला. हा टेम्पो पळून जाण्यासाठी एका कार मधील इसमांनी मदत केली. त्यानंतर हा टेम्पो काशीमीरा पोलिसांनी दहिसर चेकनाका येथे पकडला.

टेम्पोचा चालक व क्लिनर यांनी गाडीमध्ये ३ मोठ्या गाई व ३ वासरे ही कुरपणे टेम्पोमध्ये कोंबुन त्यांना चारा पाण्याची कोणतीही व्यवस्था न करता त्यास बांधुन त्यांच्या कत्तलीसाठी वाहतुक केली. याप्रकरणी अजमत नसीबली खान, मोहम्मद रफीक कुरेशी, टेम्पोचा चालक यांच्या विरोधात काशीमीरा पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता विविध कलम व प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियमसह महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीचा शोध सुरु असुन हा गुन्हा नायगांव पोलिस ठाण्यात वर्ग करण्यात आला आहे.

पुढारी पु. पान क्र. 2

# वसई-विरारमध्ये बेकायदा रिक्षा थांबे

**विरार : पुढारी वृत्तसेवा**

वसई -विरार शहरातील मुख्य रस्त्यांवर अवैधरीत्या रिक्षा स्थानक उभारले गेले आहेत. या उभारलेल्या रिक्षा स्थानकांमुळे रस्ते आखूड झाले असून शहरातील वाहतूक कोंडीत दिवसागणिक भर पडली आहे. अशा रस्त्यावर उभारलेल्या अवैध रिक्षा स्थानकांवर पोलीस कार्यवाही करत नसल्यामुळे शहरातील रस्त्यावर शेकडो स्थानके उभी राहिली आहेत .अशा रिक्षा स्थानकांवर पोलिसांनी त्वरित कारवाई करावी अशी मागणी होऊ लागली आहे.या रिक्षा स्थानकांमुळे आठ फुटीचे रस्ते चार फुटावर आले आहेत. त्यामध्ये रिक्षा चालक रस्त्यात रिक्षांची रांग लाऊन प्रवाशांची वाट बघत असलामुळे शहरातील वाहतूक कोंडी होण्याचे प्रमाण वाढले आहेत. शुक्रवारी आणि रविवारी शहरातील वाहन चालकांना रस्त्यावर देखील तासंतास वाहतूक कोंडीचा सामना करत उभे राहावे लागते.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

पुढारी पान क्र. 7

# भाईंदरमध्ये आता ट्रक, बससाठीही पार्किंगची सुविधा

## स्थानिक वाहतूक शाखेकडून मात्र अद्यापही एनओसी नाही

**भाईंदर : राजू काळे**

मिरा-भाईंदर शहरात येणाऱ्या टुरिस्ट तसेच विविध कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांची ने-आण करणाऱ्या बससह ट्रक आदी अवजड वाहने वाहतुकीच्या रस्त्यांवर कुठेही पार्क केली जात असल्याने पालिकेने आता या वाहनांना पार्किंगची सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र यासाठी स्थानिक वाहतूक शाखेची आवश्यक ठरणारा ना हरकत दाखला अद्यापही देण्यात आला नसल्याचे समोर आले आहे.

पालिकेने तसा ठराव १५ ऑक्टोबर रोजीच्या प्रशासकीय बैठकीत मंजूर करण्यात आला असून ट्रक व बसच्या सशुल्क पार्किंगसाठी भाईंदर पश्चिमेकडील नेताजी सुभाषचंद्र बोस मैनदानालगत तसेच मैदानासमोरील जागा निश्चित करण्यात आली आहे. या ठिकाणच्या पार्किंगसाठी स्थानिक वाहतूक शाखेची आवश्यक ठरणारी एनओसी अद्याप देण्यात आलेली नाही. एनओसी देण्याबाबत पालिकेने वाहतूक शाखेला १९ सप्टेंबर रोजी पत्रव्यवहार केला होता.

दरम्यान पालिकेने येथील पार्किंगची क्षमता तपासली असता एकूण २६ अवजड वाहने या ठिकाणी पार्क करता येणार असल्याचे सांगण्यात आले. या वाहनांच्या पार्किंगचे दर नव्याने नव्हे तर ८ डिसेंबर २०१७ रोजीच्या महासभेत मंजूर करण्यात आलेल्या ठरावानुसार निश्चित करण्यात आले आहे. त्यात पहिल्या सहा तासांकरिता ७० रुपये, १२ तासांसाठी १२५ रुपये तर २४ तासांसाठी १७५ रुपये दर निश्चित करण्यात आला आहे.

मात्र नियमितपणे पार्क केल्या जाणाऱ्या अवजड वाहनांसाठी मासिक पासची सुविधा देखील उपलब्ध करून देण्यात येणार असून मासिक पासाकरिता ४ हजार रुपये मोजावे लागणार आहेत. याच ठिकाणी काही अवैधरीत्या पार्क केल्या जाणाऱ्या एका खासगी टुरिस्ट बसचालक व वाहकाने काही वर्षांपूर्वी समोरील झोपडपट्टीत राहणाऱ्या एका ६ वर्षाच्या चिमुरडीवर अत्याचार केल्याची घटना घडली होती.

अत्याचार करणाऱ्यांनी तिला नायगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ससुनवघर येथील जंगलसदृश झाडीत जखमी अवस्थेत टाकले होते. पोलिसांनी घटनेची गंभीर दखल घेत आरोपींचा शोध घेऊन त्यांना बेड्या ठोकल्या.

यानंतर याठिकाणी अवजड वाहनांना प्रामुख्याने टुरिस्ट बस पार्क करण्यास राजकीय विरोध सुरु झाला. तर वाहतूक शाखेने येथे पार्क केल्या जाणाऱ्या अवजड वाहनांवर दंडात्मक कारवाईला सुरुवात केली. दरम्यान पार्क केलेल्या एका बसची तोडफोडही झाली होती. विशेष म्हणजे या ठिकाणी मानवी रहदारी तुरळक असल्याने सशुल्क पार्क केल्या जाणाऱ्या वाहनांसह पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी कोण घेणार, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

### सुरक्षा रक्षकावरच जबाबदारी

पालिकेने या ठिकाणी ४ कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीला मंजुरी दिली असून त्यांच्यासोबत मात्र एकही सुरक्षा रक्षकाची नियुक्ती करण्यात आली नसल्याचे समोर आले आहे. त्यावर उपाय म्हणून सुभाषचंद्र बोस मैदानात कर्तव्यावर असलेल्या सुरक्षा रक्षकावरच पार्किंगच्या सुरक्षेची जबाबदारी सोपविण्यात येणार असल्याचे सुत्राकडून सांगण्यात आले.



### निवडणुकीनंतर पार्किंग सुरू करणार

बोस मैदान सुमारे १३ हेक्टर क्षेत्रात वसले असून त्यातील सुरक्षेसाठी एका पाळीत एकच सुरक्षा रक्षकाची नियुक्ती करण्यात आली आहे. आता या मैदानालगत अवजड वाहनांची पार्किंग सुरू झाल्यास तेथील सुरक्षासुद्धा मैदानातील सुरक्षा रक्षकालाच पाहवी लागणार आहे. यामुळे या ठिकाणच्या असामाजिक घटनांना निमंत्रण देण्यासारखे असल्याचा आरोप होऊ लागला आहे. येथील अवजड वाहनांची पार्किंग यंदाची विधानसभा निवडणूक पार पडल्यानंतरच सुरू केली जाणार असून तत्पूर्वी त्याचा सर्व बाजूंनी आढावा घेण्यात येत असल्याचे सुत्राकडून सांगण्यात आले.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

पुण्यनगरी पृ. पान क्र. 1

# समाजमाध्यमांवरील आक्षेपार्ह पोस्टवर गुन्हे दाखल करणार

## मीरा–भाईंदर पोलिसांची करडी नजर, प्रत्येकाला सावधगिरी बाळगण्याचा सल्ला

**। मीरा रोड :** राज्यात विधानसभा निवडणुकीची पार्श्वभूमीवर सोशल मीडियातून समाज माध्यमांवर कुठलीही पोस्ट करताना किंवा प्रतिक्रिया देताना तसेच पक्षाचा अथवा उमेदवारांचा प्रचार करताना प्रत्येकाने सावधगिरी बाळगावी. आदर्श आचारसंहिता काळात आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्यांवर निवडणूक आयोगासह मीरा भाईंदर पोलिसांची करडी नजर ठेवली जाणार आहे. आक्षेपार्ह पोस्ट समाज माध्यमावर व्हायरल करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात येईल असा इशारा पोलीस उपायुक्त प्रकाश गायकवाड यांनी दिला आहे.

राज्यात निवडणूका विधानसभा जाहीर झाल्यापासून निवडणूकीची आदर्श आचारसंहिता सुरू आहे. या काळात सोशल मीडियाचा वापर करून व्हॉट्सअप, फेसबुक, एक्स हँडल, गुगल, शेअरचॅट व इन्स्टाग्राम आणि इतर यासारख्या माध्यमातून खोटी माहिती देणे, अफवा पसरवणे, समाज माध्यमांवर चुकीच्या पद्धतीने माहिती पोस्ट करणे, तसेच निवडणूक काळात एखाद्या उमेदवाराचा प्रचार करणे व



गिफ्ट वाटप करणे, तसेच उमेदवाराला मतदान करा तसेच त्यांना निवडून द्या असे प्रचार साहित्य किंवा असा काही प्रकार केल्यास संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. निवडणूक काळात समाजमाध्यमांचा गैरवापर करू नये, असे आवाहन पोलीस उपायुक्त गायकवाड यांनी केले आहे.

नागरिकांनी केवळ निवडणुकीच्या काळातच नव्हे तर कधीही समाज माध्यमांवर धार्मिक भावना दुखावणारा मजकूर, फोटो पोस्ट करू नये. देशाच्या एकतेला बाधा येईल असा कोणत्याही संप्रदाय विरोधातला मजकूर, अफवा पसरवणारा, जीवे मारण्याची धमकी देणारा, अश्लील मजकूर, चाईल्ड पोर्नोग्राफी आदी पोस्ट करणारा आणि ती पोस्ट शेअर करणारा अशा दोघांनाही दोषी ठरवले जाते. यापैकी काही गुन्ह्यांसाठी तुरुंगवास, सायबर गुन्ह्यासाठी ३ वर्षे ते आजीवन तुरुंगवास, तसेच एक लाख ते १० लाखा पर्यंतचा दंड होऊ शकतो, याकडे सुद्धा गायकवाड यांनी लक्ष वेधले आहे. तसे करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात येतील, असे सांगितले आहे.

पुण्यनगरी पृ. पान क्र. 7

# मीरा-भाईंदर मतदारसंघात कोट्यधीश मतदारांची मांदियाळी

## निवडणूक आयोगाकडील नामांकन अर्जातील माहितीतून उघडकीस

**। मीरा रोड -** मीरा-भाईंदर विधानसभा मतदारसंघात निवडणूक लढवणारे प्रमुख पक्षाचे भाजपचे नरेंद्र मेहता, काँग्रेसचे मुजफ्फर हुसेन, मनसेचे संदीप राणे, अपक्ष गीता जैन, अपक्ष हंसूकुमार पांडे, अपक्ष अरुण कदम हे कोट्यधीश आहेत. हे उमेदवार कोट्यधीश असल्याचे त्यांनी निवडणूक आयोगाकडे नामांकन अर्जात भरलेल्या माहितीतून समोर आले आहे.

मीरा भाईंदर विधानसभा मतदारसंघात उमेदवारी अर्ज भरलेल्या प्रमुख पक्षाचे उमेदवार व काही अपक्ष उमेदवार हे कोट्यधीश असल्याचे उमेदवारी अर्जात भरलेल्या माहितीवरून दिसून आले आहे. काँग्रेसचे उमेदवार मुझफ्फर हुसेन बी. कॉम असून, त्यांच्याकडे ६७ कोटींच्या जंगम मालमत्तेसह एकूण ९० कोटींची मालमत्ता आहे. हुसेन यांच्यावर एक गुन्हा दाखल आहे.

मनसेचे संदीप राणे हे चौथी पास असून, त्यांच्याकडे चार कोटींची मालमत्ता आहे. त्यांच्यावर दोन गुन्हे दाखल आहेत.




भाजपचे उमेदवार नरेंद्र मेहता हे आठवी पास असून, त्यांच्याकडे स्थावर आणि जंगम अशी ५० कोटींची मालमत्ता आहे. त्यापैकी बँक, रोखे, शेअर, दागिने इ. मिळून सुमारे ४५ कोटींची जंगम व ४ कोटींची स्थावर मालमत्ता आहे. त्यांच्या पत्नीच्या नावे १२१ कोटींची मालमत्ता आहे. मेहता यांच्याविरोधात विविध प्रकारचे १८ गुन्हे दाखल आहेत. त्यातील काही प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत.

विद्यमान अपक्ष आमदार गीता जैन यांनी मेडिकल लॅबोटरी या विषयात पदवी घेतलेली आहे. त्यांच्याकडे बँक खात्यातील रक्कम, शेअर्स व रोखे, दागिने मिळून सुमारे चार कोटी ७५ लाखांची जंगम, तर ८५ लाखांची स्थावर मालमत्ता आहे. त्यांचे पती भरत जैन यांच्याकडे स्थावर आणि जंगम मालमत्ता मिळून तब्बल ३८६ कोटींची मालमत्ता आहे. जैन यांचे पाच वर्षांपूर्वी वार्षिक उत्पन्न सुमारे २४ लाख रुपये होते. आता वार्षिक उत्पन्न सुमारे ६० लाख रुपये आहे. जैन यांच्यावर चार गुन्हे दाखल आहेत.

अपक्ष उमेदवार अरुण कदम यांच्याकडे सुमारे ८.५ कोटींची मालमत्ता आहे. त्यांच्याविरोधात चार प्रलंबित खटले आहेत. अपक्ष उमेदवार हंसुकुमार पांडे हेदेखील कोट्यधीश आहेत. त्यांच्याकडे सुमारे पाच कोटींची जंगम आणि सुमारे सहा कोटींची स्थावर मालमत्ता आहे. त्यांचे शिक्षण एसएससीपर्यंत झाले आहे.

CamScanner

Scanned with OKEN Scanner

पुण्यनगरी -पु. पान क्र. 7

# निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ३८ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या

## विशेष पोलीस महानिरीक्षक के. एम. मल्लिकार्जुन प्रसन्ना यांचे आदेश




**३० ऑक्टोबर २०२४ रोजी निवडणूक आयोग आणि मुख्य निवडणूक अधिकारी यांनी दिलेल्या निर्देशानुसार बदली पात्र असलेल्या पोलीस निरीक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. पोलीस महासंचालक आस्थापना विभागाचे विशेष पोलीस महानिरीक्षक के. एम. मल्लिकार्जुन प्रसन्ना यांनी या बदलीचे आदेश दिले आहेत.**

**। मीरा रोड -** राज्यात विधानसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या असून, अवघ्या काही दिवसांवर निवडणूक आली आहे. ऐन दिवाळीत विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य पोलीस दलातील मुंबई, नवी मुंबई, मीरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयातील २२१ तर उर्वरित पोलीस आयुक्तालय आणि जिल्हा अधीक्षक कार्यालयातील ४२ अशा एकूण २६३ पोलीस निरीक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. यामध्ये मीरा भाईंदर वसई विरार पोलिस आयुक्तालयातील विविध पोलीस टाण्यांतील ३८ जणांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका जाहीर होण्यापूर्वी निवडणूक आयोगाने प्रशासकीय अधिकारी, पोलिस अधिकारी यांच्या ऑगस्ट पर्यंत बदल्या करण्याचे निर्देश राज्य सरकारला दिले होते. परंतु राज्य सरकारने काही अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या तर काही अधिकाऱ्यांच्या बदल्याकडे दुर्लक्ष केले. त्यानंतर २७ सप्टेंबरला केंद्रीय निवडणूक आयोगाचे राज्यात पाहणी करण्यासाठी आले होते. त्यावेळी शासनाला बदल्याबाबत जाब विचारला होता. ३० ऑक्टोबर २०२४ रोजी निवडणूक आयोग आणि मुख्य निवडणूक अधिकारी यांनी दिलेल्या निर्देशानुसार बदली पात्र असलेल्या पोलीस निरीक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. पोलीस महासंचालक आस्थापना विभागाचे विशेष पोलीस महानिरीक्षक के. एम. मल्लिकार्जुन प्रसन्ना यांनी या बदलीचे आदेश दिले आहेत.

पोलीस दलातील ज्या बदल्या करण्यात आल्या आहेत. त्यापैकी मीरा-भाईंदर वसई विरार आयुक्तालयातील एकूण ३८ पोलीस निरीक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. पोलीस निरीक्षक संजय दत्तू हजारे, शैलेंद्र रघुनाथ नगरकर, रमेश पंढरीनाथ भामे, जितेंद्र बोदण्पा वनकोटी, जयराम नरसिंहराव रणवरे, सदाशिव विष्णू निकम, राजेंद्र गणपत कांबळे, विजयकुमार अधिकराव चव्हाण, राजू किसन माने, बाळासाहेब राघुजी पवार, चंद्रकांत सुधाकर सरोदे, विलास सखाराम सुपे, दिलीप हरिभाऊ राख, सुधीर निवृत्ती गवळी, प्रफुल रमेश वाघ, विवेक शांताराम सोनवणे, विजया सुखदेव पवार, राहुल कुमार अरुण पाटील, रणजीत सूर्यकांत आंधळे, संजय शांताराम केदारे, विठ्ठल वीराप्पा चौगुले, सुशीलकुमार अंकुशराव शिंदे, सुधीर अर्जुन चव्हाण, ऋषिकेश संपत पवळ, सागर चंद्रकांत टिळेकर, कुमारगौरव माधवराव धादवड, राहुल सखारामा सोनवणे, मिलिंद काळू साबळे, सचिन भारत कोतमीरे, शिवानंद शशिकर देवकर, जिलानी कादर सय्यद, श्याम आदिनाथ आपेट, मंगेश अरुणराव अंधारे, अब्दुलहक महमदगौस देसाई, अशोक कठाळू कांबळे, संतोष सोपान चौधरी, जितेंद्र युवराज पाटील व प्रकाश पांडुरंग मासाळ अशी नावे असलेल्या ३८ पोलीस निरीक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

लोकसत्ता पु. पान क्र. 1

# नालासोपाऱ्यातील ४१ इमारतींतील रहिवाशांना निवडणुकीपर्यंत दिलासा

## ..तर याच जागेवर रहिवाशांचे पुनर्वसन शक्य

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** नालासोपारा येथील ४१ अनधिकृत इमारतींवर निवडणूक काळात कारवाई केली जाणार नसल्याचे वसई-विरार महापालिकेने सांगितले आहे. मतदार विस्थापित होऊ नये या निवडणूक आयोगाच्या एका नियमाच्या आधार घेत पालिकेने तात्पुरती कारवाई स्थगित केली आहे. त्यामुळे रहिवाशांना तात्पुरता दिलासा मिळाला असून दिवाळी सण आनंदात साजरा करता येणार आहे.

नालासोपारा पूर्वेच्या अग्रवाल नगरी येथे २०१० ते २०१२ या कालावधीत बनावट बांधकाम परवानगी (सीसी) आणि भोगवटा प्रमाणपत्र (ओसी) बनवून ४१ अनधिकृत इमारती बांधण्यात आल्या आहेत. त्यात दोन हजारांहून अधिक कुटुंबे रहात आहेत. मुंबई उच्च न्यायालय तसेच सर्वोच्च न्यायालयाने या ४१ इमारती अनधिकृत ठरवून पालिकेला कारवाईचे निर्देश दिले होते. त्यामुळे वसई-विरार महापालिकेने कारवाईची प्रक्रिया सुरू केली होती. पहिल्या टप्प्यात धोकादायक असणाऱ्या ७ इमारतींवर कारवाई केली जाणार होती. दरम्यान, दिवाळी सणात कारवाई करण्यात येऊ नये अशी विनंती रहिवाशांनी केली होती.

**सर्वोच्च न्यायालयाने या ४१ इमारतींवर कारवाईचे निर्देश देताना या इमारतींमधील रहिवाशांचे पुनर्वसन व्हावे असा मत व्यक्त केले होते. येथे विकासकाला टाऊनशीप बांधण्यास परवानगी दिल्यास रहिवाशांचे याच भागात पुनर्वसन होईल आणि सांडपणी प्रकल्प देखील उभारता येईल असा प्रस्ताव पालिकेकडे दिला आहे, अशी माहिती रहिवाशांच्या घरांसाठी लढा देणारे आगरी सेनेचे अध्यक्ष कैलास पाटील यांनी सांगितले. हा प्रस्ताव संमत झाल्यास कारवाई होणार नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. दरम्यान, पहिल्या टप्प्यात ज्या ७ धोकादायक इमारती तोडण्यात येणार आहे, त्यातील रहिवाशांचे खासगी बांधकाम व्यावसायिकांच्या इमारतीत तात्पुरती व्यवस्था करण्यात आली आहे.**

# महामार्ग वाहतूक नियंत्रणातील समस्या कायम

## चिंचोटी महामार्ग पोलीस विभाग अद्याप मिरा-भाईंदर पोलीस आयुक्तालयांतर्गत नाही

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई :** मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक नियंत्रणासाठी असलेला चिंचोटी महामार्ग पोलीस विभाग मिरा भाईंदर पोलीस आयुक्तालयांतर्गत घेण्यात आल्याचा शासन निर्णय जाहीर झाला आहे. मात्र त्यास वीस दिवस उलटून गेले तरीही अजून त्यांची अंमलबजावणी झाली नाही. त्यामुळे महामार्ग वाहतूक नियंत्रणातील अडचणी कायम आहेत.

वसई विरार व मिरा भाईंदर शहराच्या पूर्वेकडील भागातून मुंबई -अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग गेला आहे. दहिसर चेक नाका ते विरार शीरसाड फाटा २७.५० किमी. ही चिंचोटी महामार्ग वाहतूक पोलिसांची हद्द आहे. त्या ठिकाणी चिंचोटी महामार्ग वाहतूक पोलीस यांच्यामार्फत वाहतूक नियंत्रण केले जात होते.

मात्र मिरा भाईंदर- वसई विरार पोलीस आयुक्तालयाची निर्मिती झाल्यानंतर हा महामार्ग आयुक्तालयाच्या अंतर्गत येत आहे. त्यामुळे या राष्ट्रीय महामार्गावर महामार्ग पोलीस आणि पोलीस आयुक्तालय अशा दोन्ही यंत्रणांकडून महामार्गाच्या सुरक्षा व वाहतूक नियंत्रण केले जात होते. परंतु शासन नियमानुसार पोलीस आयुक्तालयांतर्गत महामार्गाच्या सुरक्षेची तसेच वाहतूक व्यवस्थेची जबाबदारी ही स्थानिक पोलीस प्रशासन म्हणजेच पोलीस आयुक्तालयाच्या हाती असते. मात्र या मार्गावर महामार्ग वाहतूक पोलिसांची यंत्रणा देखील कार्यरत आहे. त्या दोन्ही यंत्रणामधील कामाच्या कार्यपद्धती वेगळ्या असल्याने वाहतूक नियंत्रण करताना अडचणी येतात. तर काही वेळा वादही निर्माण होत होते. त्यामुळे महामार्गाचा पूर्ण ताबा पोलीस आयुक्तालयाकडे वर्ग करण्यात यावा असा प्रस्ताव गृहविभागाला दिला होता. त्या प्रस्तावाला गृहविभागाने मंजुरी दिली आहे.

### वाहतूक कोंडी

**मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक नियंत्रणाचे काम महामार्ग वाहतूक पोलीस यांच्याकडूनच केले जात आहे. मात्र सद्यस्थितीत महामार्गावर रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्याचे काम सुरू असल्याने सातत्याने वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होते. त्याचे नियंत्रण करताना महामार्ग पोलिसांना चांगलीच कसरत करावी लागते. महामार्ग आयुक्तालयाच्या अंतर्गत समावेश झाला असता तर त्याची अंमलबजावणी झाली असती तर त्याचे वाहतूक विभागाकडून नियोजन करून वाहतूक नियंत्रण करणे सोपे झाले असते.**

# विजेच्या धक्क्याने डम्परचालकाचा मृत्यू

**भाईंदर :** दिवाळीनिमित्त वाहन धुण्यासाठी नदीकिनारी गेलेल्या एका डम्परचालकाचा विद्युत प्रवाहाच्या संपर्कात आल्याने मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. विजय घोडके (३७) असे मृत व्यक्तीचे नाव आहे.

डम्पर चालक घोडके चेना नदीकिनाऱ्यावर घेऊन आला होता. या वेळी अर्ध्याहून अधिक डम्परची धुलाई झाल्यानंतर त्याने मागील ट्रॉलीचा भाग वर केला. मात्र हा लोखंडी भाग वर असलेल्या विद्युत तारांना जाऊन आदळला आणि त्यात विद्युत प्रवाह वाहून त्याचा धक्का थेट वाहनात बसलेल्या घोडके यांना बसला. यामुळे त्याचा जागीच मृत्यू झाला.जवळच असलेल्या काही नागरिकांनी हि माहिती दिली. यासंदर्भात काशिगाव पोलिसांनी अपमृत्यूची नोंद केली असून मृतदेह शवविच्छेदनासाठी भाईंदरच्या जोशी रुग्णालयात पाठवला आहे.

# विरारमध्ये महिलेची हत्या

**वसई:** विरारमध्ये चारित्र्याच्या संशयावरून एका व्यक्तीने पत्नीची गळा आवळून हत्या केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. विरारच्या नारंगी बायपास रस्त्यावरील सुमंगल अपार्टमेंटमध्ये बुधवारी ही घटना घडली. रोशनी स्वप्नील ठावरे (२८) असे मृत महिलेचे नाव आहे. या प्रकरणी विरार पोलिसांनी पती स्वप्नील ठावरे याला अटक केली आहे.

रोशनी हिचे अन्य व्यक्तीसोबत संबंध असल्याचा संशय पती स्वप्नील घेत होता. त्यावरूनच त्याच्यात वाद होत होते. बुधवारीही याच कारणावरून त्यांच्यात वाद झाला. या वादातून स्वप्नील याने पत्नी रोशनी हीचा गळा आवळून व कात्री भोसकून हत्या केली.

याप्रकरणी विरार पोलिसांनी आरोपी स्वप्नील ठावरे याला अटक करून त्याच्या विरोधात हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत

CS CamScanner
Scanned with OKEN Scanner

नवभारत - पृ. पान क्र. 3

# कांग्रेस की उम्मीदवारी से शिवसैनिक नाराज

## उद्धव सेना की मांग, 'पंकज देशमुख हटाओ, शिवसेना बचाओ', कार्यकर्ताओं ने जमकर की नारेबाजी

■ **नालासोपारा,** (सं). एक ओर विधानसभा चुनाव को लेकर सभी दल अपने पदाधिकारी व कार्यकर्ताओं को एकजुट कर अपने उम्मीदवार को जीत हासिल कराने के लिए एडी चोटी का जोर लगा रही है. ऐसे में शिवसेना (उद्धव) गुट के पालघर जिला प्रमुख पंकज देशमुख के खिलाफ शिवसैनिकों ने बगावती तेवर अपना ली है. शिवसैनिक 'पंकज देशमुख हटाओ, शिवसेना बचाओ' के नारे बुलंद कर जिला प्रमुख देशमुख को हटाने की मांग कर रहे हैं. इस बाबत बुधवार की रात मानिकपुर स्थित शाखा कार्यालय पर एकजुट हुए शिव सैनिकों ने पंकज देशमुख के खिलाफ जमकर नारेबाजी की.



शिवसैनिकों का आरोप है कि, यदि देशमुख ने प्रयास किया होता तो आज नालासोपारा व वसई विधानसभा सीट से शिवसेना का उम्मीदवार मैदान में होता. लेकिन उन्होंने ऐसा न करते हुए सेना को भारी नुकसान पहुंचाया है. वहीं इस मामले की जानकारी के बाद गुरुवार को देशमुख समर्थक बड़ी संख्या में जिला कार्यालय पर एकत्र हुए और पंकज के समर्थन में नारेबाजी करने लगे. शिवसेना (उद्धव) गुट के वसई विरार जिला विभाग प्रमुख सुरेंद्र सिंह (राज) ने कहा कि, उम्मीदवार को टिकट देने का अधिकार शीर्ष नेतृत्व का है, इसमें पंकज देशमुख की कोई भूमिका नहीं बनती. वर्तमान में चल रहे चुनाव को देखते हुए इस प्रकार की बात करनी समाज के बीच बिल्कुल गलत संदेश है. यदि परिवार के बीच कोई विवाद है भी तो उसे सड़क पता लाने की बजाय घर में ही सुलझा लेनी चाहिए थी. पूर्व जिला प्रमुख शिरीष चव्हाण ने बताया, शिवसैनिक पंकज देशमुख की भूमिका से नाराज हैं. उन्होंने डेढ़ वर्ष में एक भी बड़ी बैठक नहीं की.

N.B.T. पान क्र. 5

# आश्रम में 14 वर्षीय छात्र ने लगाई फांसी

■ **निसं, वसई:** राजीवली स्थित एक आश्रम में बुधवार की सुबह 14 वर्षीय एक छात्र ने फांसी लगाकर खुदकुशी कर ली। वसई पूर्व के राजीवली गांव के पास आशांकुर आश्रम है। यहां कई बच्चे पढ़ते हैं। बुधवार की सुबह साढ़े दस बजे दीपेश गणेश थापड (14) ने अज्ञात कारणों से चर्च के बगल वाले कमरे में लगे पंखे से फांसी का फंदा बनाया और अपनी जान दे दी। आश्रम में मौजूद कर्मचारी ने उसे एक निजी अस्पताल में भर्ती कराया, जहां डॉक्टरों ने जांच के बाद मृत घोषित कर दिया। पुलिस ने एडीआर के तहत मामला दर्ज कर लिया है।

# पुलिस ने तड़ीपार आरोपी को तलवार के साथ किया गिरफ्तार

■ **निसं, वसई:** वालीव पुलिस ने दो साल के लिए पांच जिलों से तड़ीपार किए गए आरोपी को नाईक पाडा इलाके में तलवार के साथ गिरफ्तार किया है। पुलिस ने उसके खिलाफ आर्म ऐक्ट के तहत केस दर्ज किया है। नाईक पाडा स्थित शिव भीमनगर निवासी कल्पेश उर्फ कल्पया किसन शिंदे (23) पर कई आपराधिक मामले दर्ज हैं। तड़ीपार किए जाने के बावजूद वह वापस आ गया था। बुधवार की शाम को वह परिसर में तलवार लेकर घूम रहा था। सूचना मिलते ही वालीव पुलिस ने उसे गिरफ्तार कर लिया।



# बिना परमिशन के पटाखे बेचने वाले 13 लोगों पर केस दर्ज

■ **निसं, वसई:** वसई-विरार में पटाखे बेचने वाले दुकानदारों पर गाइडलाइंस का उल्लंघन करने के आरोप मिलने पर नायगांव, मानिकपुर, आचोले व तुलिंज पुलिस ने संयुक्त कार्रवाई करते हुए बिना परमिशन के पटाखे बेचने वाले 13 दुकानदारों के खिलाफ केस दर्ज किया है। पटाखे की दुकान के लिए मनपा, कलेक्टर व पुलिस विभाग की परमिशन की जरूरत होती है। बड़े व तेज आवाज वाले पटाखों को बेचने पर पाबंदी है, लेकिन दुकानदार बिना परमिशन के सड़कों पर खुलेआम पटाखे बेच रहे थे। पिछले साल नालासोपारा स्टेशन परिसर में पटाखे की दुकान में आग लगने से पांच दुकानें जलकर खाक हो गई थीं।

# मुंबईबाहेर बदलीच्या ठिकाणी रुजू व्हा

## २१ पोलीस निरीक्षकांना उच्च न्यायालयाचे आदेश

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन म्हणून २१ पोलीस निरीक्षकांनी मुंबईबाहेर झालेल्या बदलीच्या ठिकाणी रुजू व्हावे, असे आदेश उच्च न्यायालयाने दिले आहेत.

या पोलीस अधिकाऱ्यांनी बदलीच्या निर्णयाविरोधात आधी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणात (मॅट) धाव घेतली होती. मॅटने त्यांच्या बदलीच्या आदेशाला अंतरिम स्थगिती देऊन त्यांना दिलासा दिला होता. त्याविरोधात अतिरिक्त मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालक (डीजीपी) यांच्यामार्फत उच्च न्यायालयात याचिका करण्यात आली होती. त्याचप्रमाणे, मॅटने २१ पोलीस अधिकाऱ्यांना त्यांच्या वैयक्तिक अडचणींच्या आधारे अंतरिम सवलत देऊन चूक केल्याचा आणि सार्वजनिक हिताला बगल दिली जाऊ शकत नसल्याचा दावा करून मॅटच्या निर्णयाला स्थगितीची मागणी केली होती. सरकारच्या या याचिकेवरील सुनावणीच्या वेळी न्यायालयाने २१ पोलीस निरीक्षकांना उपरोक्त आदेश दिले. त्याच वेळी, २१ अधिकाऱ्यांचे बदलीच्या ठिकाणी रुजू होणे हे त्यांनी मॅटमध्ये केलेल्या अर्जावरील सुनावणीच्या आड येणार नाही. तसेच, हे अधिकारी पूर्वग्रहदूषित न होता बदलीच्या ठिकाणी रुजू होतील, असे न्यायालयाने प्रामुख्याने स्पष्ट केले.

या अधिकाऱ्यांनी बदली रोखण्यासाठी दिलेल्या कारणांत तथ्य असल्याचे नमूद करून मॅटच्या अध्यक्ष न्यायमूर्ती मृदुला भाटकर यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने त्यांना मुंबईबाहेर बदली होण्यापासून अंतरिम दिलासा दिला होता. घरगुती अडचणी, कौटुंबिक सदस्यांना असलेले आजार, शारीरिक अडचणी, मुले दहावी आणि बारावीमध्ये शिकत असल्याच्या कारणांचा त्यात समावेश होता.

लोकमत पान क्र. ०२

# फटाके फोडण्यावरून दोन गटांत राडा

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : वर्दळीच्या रस्त्यावर फटाके फोडण्यावरून राडा करणाऱ्या दोन गटांतील पाच जणांना भाईंदर पोलिसांनी अटक केली आहे. वरिष्ठ पोलिस निरीक्षक धीरज कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस अधिक तपास करीत आहेत.

भाईंदर पूर्वेकडील नवघर मार्गावर वर्दळीच्या ठिकाणी दीपक दास, सामंता बाप यांच्यासह तिघे जण फटाके फोडत होते. त्यावेळी रस्त्यावरून दुचाकीने जाणाऱ्या एकाने रस्त्यावर बॉम्ब का फोडता, असा जाब विचारत त्यांना शिवीगाळ केली. त्यावरून दोन्ही बाजूंच्या गटामध्ये राडा झाला. यावेळी एकमेकांना जबर मारहाण करण्यात आली तसेच बर्फ तोडण्याच्या तीक्ष्ण हत्याराने वारही करण्यात आले.



पोलिसांनी याप्रकरणी एकूण नऊ जणांविरोधात गुन्हा दाखल करत पाच जणांना अटक केली. अटक केलेल्यांमध्ये सामंता, दीपक, रॉबिन, आबिद व साबिद यांचा समावेश आहे.

Scanned with OKEN Scanner

दैनिक भास्कर पान क्र. ३

# बच्चे का अपहरण कर 50 हजार रुपए की मांगी रंगदारी

- आरोपी की तलाश में जुटी पुलिस

भास्कर संवाददाता | विरार

नालासोपारा क्षेत्र में एक बच्चे का अपहरण कर 50 हजार रुपए की रंगदारी मांगने का मामला सामने आया है। तुलिंज पुलिस ने परिजन की शिकायत पर अपहरण और रंगदारी का मामला दर्ज किया है। आरोपी की पहचान सोनी के रूप में हुई है।

पुलिस के मुताबिक, बच्चा माता-पिता के साथ नालासोपार (पूर्व) में रहता है। आरोपी भी उसी क्षेत्र का निवासी है। दोनों परिवार में अच्छी जान-पहचान है। 28 अक्टूबर की दोपहर साढ़े तीन बजे से आरोपी ने बच्चे का अपहरण किया और दादर ले गया था। उसने बच्चे से उसकी मां का मोबाइल नंबर लिया और अपहरण की जानकारी दी। साथ मे धमकी दी कि पुलिस को सूचना देने पर बच्चें को जान से मार देंगे। बच्चे को छोड़ने के एवज में आरोपी ने 50 हजार रुपए की रंगदारी मांगी। उसने रंगदारी की रकम ऑनलाइन ट्रांसफर करने की बात कही। हालांकि इस दौरान परिजन काफी डर गए और तुलिंज पुलिस को मामले से अवगत कराया। पुलिस टीम ने सीसीटीवी फुटेज और लोकेशन के आधार पर बच्चे को बरामद किया, लेकिन आरोपी वहां से फरार हो गया। सहायक पुलिस निरीक्षक सचिन शिंदे ने कहा कि बच्चा और आरोपी दोनों एक-दूसरे को पहचानते हैं।

# नालासोपारा: घर में घुसकर महिला के साथ दुराचार, आरोपी गिरफ्तार

भास्कर संवाददाता | वसई

नालासोपारा में एक महिला से दुराचार करने का मामला सामने आया है। महिला ने आरोप लगाया कि पति के बाहर जाते ही आरोपी ने इस घटना को अंजाम दिया। महिला की शिकायत पर तुलिंज पुलिस ने आरोपी को गिरफ्तार कर लिया है। वहीं, इस घटना को लेकर क्षेत्र में आक्रोश है। शहर के समाजसेवकों ने कानून-व्यवस्था पर सवाल उठाया है। आरोपी की पहचान सूरज कार्तिक गुप्ता के रूप में हुई है।

पुलिस के मुताबिक, 21 वर्षीय रजिया (नाम बदला हुआ) पति के साथ रहती है। सुबह चार बजे उसका पति ग्रांड रोड कपड़ा खरीदने गया था। करीब पांच बजे आरोपी ने रजिया के घर का दरवाजा तोड़कर भीतर घुस गया और महिला से मारपीट करते हुए उसे जान से मारने की धमकी देकर उसके साथ दुराचार की वारदात को अंजाम दिया। साथ ही किसी को घटना की जानकारी देने पर उसके पति को जान से मारने की धमकी दी। पुलिस के मुताबिक, रजिया का पति दोपहर जब घर पहुंचा तो उसने घटना की जानकारी दी। इससे बाद पति के कहने पर आरोपी के खिलाफ तुलिंज पुलिस स्टेशन में शिकायत दर्ज कराई। मामले को गंभीरता से लेते हुए पुलिस ने आरोपी को बुधवार शाम गिरफ्तार कर लिया। फिलहाल पुलिस इस मामले की जांच कर रही है।

# वीडियो कॉल पर पत्नी कर रही थी बात, पति ने ले ली जान

- चाकू और कैंची से गोदकर पत्नी की हत्या
- चरित्र पर करता था शक, आरोपी गिरफ्तार

भास्कर संवाददाता | विरार

एक पति ने अपनी पत्नी की चाकू और कैंची से गोद-गोदकर हत्या कर दी। उसका कसूर सिर्फ इतना था कि वह वीडियो कॉल पर किसी अन्य व्यक्ति से बात कर रही थी। विरार पुलिस ने मृतक महिला के पिता की शिकायत पर आरोपी के खिलाफ हत्या का मामला दर्ज कर गिरफ्तार किया है। आरोपी की महिला से दूसरी शादी थी। आरोपी की पहचान स्वप्निल प्रभाकर ठावरे के रूप में हुई है, जबकि मृतक महिला का नाम रोशनी स्वप्निल ठावरे बताया गया है।

पुलिस के मुताबिक, आरोपी स्वप्निल अपनी पत्नी और बेटे के साथ विरार (पूर्व) नारंगी बायपास रोड पर रहता है। दो साल पहले



रोशनी का स्वप्निल के साथ दूसरा प्रेम विवाह हुआ था। रोशनी को पहले पति से पांच साल का एक बच्चा है। पुलिस ने बताया कि बुधवार शाम पत्नी फोन पर अन्य व्यक्ति से वीडियो कॉल पर बात कर रही थी, तभी पति अचानक घर में आ गया। स्वप्निल पत्नी से उस व्यक्ति के बारे में पूछताछ करने लगा, लेकिन पत्नी ने कुछ भी बताने से इनकार कर दिया। इस दौरान दोनों के बीच जमकर झगड़ा हुआ। हालांकि कुछ समय बाद दोनों में सुलह भी हो गई।

CamScanner
Scanned with OKEN Scanner

THE FREE PRESS JOURNAL - Pag-05

www.freepressjournal.in

# Bail to three in Nallasopara arms haul case

Charul Shah Joshi
MUMBAI

In the 2018 Nallasopara arms haul case, the special court has granted bail to three of the 14 accused –Anmol Kale, Sharad Kalaskar and Rishikesh Devdikar – on the grounds of six-year long incarceration.

The three were traced and arrested by the Maharashtra Anti-Terrorism Squad on the basis of secret information that a group was active and likely to commit a terror act. The case came to light with the arrest of Kalaskar.

As per the prosecution's case, the group had allegedly decided to oppose everyone and everything against the principles of Hindu religion. A part of the conspiracy was planning an attack at Sunburn Festival in Pune in December 2017 with crude and petrol bombs, firearms, and by pelting stones.

The prosecution had claimed that the ideology of the accused was behind the murders of Narendra Dabholkar, Govind Pansare, Gauri Lankesh, MM Kalburgi and bid on KS Bhagwan's life.

The court observed that many of the accused have been granted bail. It noted "vague and uncertain" evidence against the accused and observed that the Pune festival concluded smoothly. "It simply means that the alleged criminal conspiracy never came to be executed," the court said.

Besides, the court also ruled against the communal allegations and said "it is sort of exercising the constitutional right to profess their own religious beliefs and nothing more than that".

The court said, "Nothing is placed on record whereby it can even remotely be inferred that, by any of the acts of any of the accused, unity, integrity, security and sovereignty of India was ever disturbed in any manner."

"Some of the accused are facing trial for the murder of renowned personalities, as mentioned in the prosecution's case, However, for that independent offence, involvement of the present accused in present offences, which are in fact never committed, cannot at all be connected, that too without any direct nexus," the court noted.

THE FREE PRESS JOURNAL Pag-07

# Driver dies of electrocution in Kashimira

Suresh Golani
MIRA BHAYANDAR

A driver was electrocuted while washing his Hyva tipper truck in Kashimira on the day of Diwali (Thursday). The deceased, who has been identified as Vijay Ghodke, drove the truck into a pool of water near Chena creek on Thursday morning. Ghodke climbed on the cargo floor to get a drum without realising that the body of the truck was flowing with current after coming into contact with live overhead power supply cables.

He suffered grievous burn injuries due to the high-voltage electric shock and died on the spot. His body was sent to the civil hospital in Bhayandar for an autopsy. An accidental death report (ADR) has been registered in this context at the Kashigaon police station. Further inves-

Scanned with OKEN Scanner